पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

सिटी न्यूज सुपरफास्ट

वाशिम ■ वर्ष १ ■ अंक ४७ ■ शनिवार दि. ११ जुलै २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

डॉ. अभय पाटील यांना मातृशोक

अकोला: स्व. डॉ. के. एस. पाटील यांच्या पत्नी तसेच अस्थीरोगतज्ञ डॉ.अभयदादा पाटील यांच्या मातोश्री कमलाबाई पाटील यांचे आज सकाळी वृद्धापकाळाने वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झाले. त्यांचा अंत्यविधी आज ११ रोजी सायंकाळी ५ वाजता मोहता मिल अकोला स्मशानभूमी येथे करण्यात येईल.

»थोडक्यात

जामिनावर सुटलेल्या आरोपीने कुटुंबासह 6 जणांना संपवले!

रंगारेड्डी : तेलंगणाच्या रंगारेड्डी जिल्ह्यात जामिनावर बाहेर असलेल्या व्यक्तीने शुक्रवारी रात्री बायको-मुलांसह सहा जणांची हत्या केली. ३५ वर्षीय या व्यक्तीने स्वतःच्या पत्नी व दोन मुलांसह पाठलाग केला म्हणून तक्रार करणाऱ्या १६ वर्षीय मुलीसह तिच्या आई आणि आजीचा देखील खून केला. १६ वर्षीय मुलीचा पाठलाग केल्याचा आरोप त्याच्यावर असून, त्याला अटकपूर्व जामीन मंजूर झाल्यानंतर गेल्या महिन्यात वैयक्तिक हमीपत्रावर त्याला जामीन मिळाला होता. हैद्राबादपासून जवळच्या अंतरावरच असणाऱ्या आरोपीच्या मूळ गावातच शुक्रवारी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली.

विधान परिषदेचे पाच सदस्य निवृत्त !

मुंबई: विधान परिषद सदस्यत्वाची सहा वर्षाची मुदत पूर्ण झाल्याने सभागृहात पाच सदस्यांना निरोप देण्यात आला. पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी निवृत्त होणाऱ्यांमध्ये सतीश चव्हाण, अरुण लाड, (राष्ट्रवादी) अभिजित वंजारी (काँग्रेस), किरण सरनाईकआणि जयंत आसगावकर (काँग्रेस) या पाच सदस्यांना समावेश आहे. विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह असून समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांना लोकशाही आणि प्रशासकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी देणारे प्रभावी व्यासपीठ असल्याचे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी सांगितले.

महाराष्ट्रावर 28 हजार कोटींच्या कर्जाचा डोंगर!

महसुली तूट वाढली; कॅगचा गंभीर इशारा

कर्जाची रक्कम वाढण्याची शक्यता

प्रतिनिधी ११ जुलै

मुंबई : देशाचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांनी (कॅग) राज्याच्या आर्थिक पारदर्शकतेवर गंभीर आक्षेप नोंदवितानाच २०२४-२५ या आर्थिक वर्षअखेर राज्याचे अर्थसंकल्पबाह्य कर्ज २८ हजार ३२५ कोटी रुपयांवर पोहोचल्याचे ताशेरे ओढले आहेत. ही कोट्यवधी रुपयांची देणी राज्याच्या अधिकृत अर्थसंकल्पी कागदपत्रांमध्ये न दाखविल्याने राज्यावरील एकूण कर्जाचा बोजा कमी दिसतो. विधिमंडळाच्या अपरोक्ष हे करण्यात आले असल्याचा आक्षेपदेखील नोंदविण्यात आला आहे.

महसूल तुटीमध्ये वाढ, बांधील खर्चाचे वाढते ओझे या राज्याच्या आर्थिक स्थितीबाबतच्या अन्य गंभीर बाबींकडेही या अहवालामध्ये लक्ष वेधले आहे. राज्याने वित्तीय तूट कायद्यातील 'जीएसडीपी'च्या २.७४ टक्के मर्यादित ठेवली असली तरी महसुली तूट २९

हजार ९९४.७६ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. याचा अर्थ राज्य दीर्घकालीन विकासात्मक मालमत्ता निर्माण करण्याऐवजी दैनंदिन प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी कर्जावर अधिक अवलंबून राहत असल्याचे स्पष्ट होते. राज्याचे सकल उत्पन्न (जीएसडीपी) ४५ लाख ३१ हजार ५१८ कोटी रुपये इतके गृहीत धरल्यास एकूण देयके 'जीएसडीपी'च्या १९.५८ टक्के इतकी आहेत. अशा प्रकारे अर्थसंकल्पाबाहेरील कर्जउभारणीमुळे आर्थिक पारदर्शकता, उत्तरदायित्वाबाबत गंभीर प्रश्न निर्माण होतात.

निधी बँकांत ठेवण्यास आक्षेप

» राज्याच्या एकूण महसुलाच्या ६३.४५ टक्के रक्कम ही वेतन, निवृत्तिवेतन, व्याज देयके आणि अनुदाने अशा बांधील खर्चावर खर्च होत आहे. याशिवाय सरकारच्या विविध प्रकारच्या बँक खात्यांमध्ये मोठ्या प्रमाणात खर्च न झालेला निधी ठेवण्याच्या पद्धतीवरही लेखापरीक्षकांनी आक्षेप घेतला आहे.

» वित्त विभागाच्या अटींनुसार या कर्जावरील मूळ रक्कम आणि व्याजाची परतफेड करण्यासाठी राज्य सरकारने दरवर्षी अर्थसंकल्पात तरतूद करणे बंधनकारक आहे. त्यामुळे ही अर्थसंकल्पाबाहेरील कर्जे राज्याच्या तिजोरीवर थेट भार टाकत असतात. 'महाराष्ट्र वित्तीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम- २००५' नुसार राज्याच्या एकूण देयकांमध्ये एकत्रित निधी आणि सार्वजनिक खाते यांतील कर्जांचा समावेश असणे आवश्यक आहे. मात्र, अर्थसंकल्पाबाहेरील या कर्जांचा समावेश न केल्यामुळे खरे चित्र दिसत नाही. राज्यावरील सार्वजनिक कर्ज आणि इतर देयके ८ लाख ५९ हजार ०९७ कोटी रुपये एवढी होती. मात्र, अर्थसंकल्पावरील कर्जाचा समावेश केल्यास राज्याची प्रत्यक्ष देणी ८ लाख ८७ हजार ४२२ कोटी रुपयांवर जाऊ शकतात.

शिवसेनेचे संपर्कप्रमुख नाशिकला रवाना

'ऑपरेशन टायगर'च्या वावड्या उठताच उद्धव ठाकरे ॲक्शन मोडवर!

प्रतिनिधी ११ जुलै

नाशिक : महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सध्या सर्वाधिक चर्चेत असलेल्या 'ऑपरेशन टायगर'चे जोरदार हादरे आता नाशिकमध्ये बसू लागले आहेत. नाशिक महानगरपालिकेतील उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे १० ते १२ नगरसेवक एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या गळाला लागल्याच्या वावड्या उठल्या आहेत. या संपूर्ण पार्श्वभूमीवर आता उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे संपर्कप्रमुख रवींद्र मिर्लेकर हे तातडीने नाशिकमध्ये दाखल झाले असून, आज त्यांनी पदाधिकारी आणि नगरसेवकांची अत्यंत महत्त्वाची आढावा बैठक बोलावली आहे. या हाय-व्होल्टेज घडामोडींमुळे नाशिकच्या राजकारणात प्रचंड सस्पेन्स निर्माण झाला आहे.

या सर्व प्रकरणाला तेव्हा गंभीर वळण मिळाले, जेव्हा ठाकरेंच्या शिवसेनेचे गटनेते केशव पोरजे यांनी पत्रकार परिषदेत एक खळबळजनक आरोप केला. पोरजे यांच्या दाव्यानुसार, 'उपमहापौरपदाचा सौदा करू पाहणारे काही एजंट आमच्या नगरसेवकांना ५ कोटी रुपयांच्या प्रभाग निधीचे आमिष दाखवून फोडण्याचा प्रयत्न करत आहेत.' यामध्ये एका वकिलाचा समावेश असून, ज्याला स्वतःला स्वीकृत नगरसेवक व्हायचे आहे, तोच ५ ते ६ नगरसेवकांच्या संपर्कात असल्याचा दावा त्यांनी केला.

13 नगरसेवक प्रत्यक्ष हजर, 2 जण अनुपस्थित

» नाशिक मनपामध्ये उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे एकूण १५ नगरसेवक आहेत. या शक्तिप्रदर्शनादरम्यान १३ नगरसेवक प्रत्यक्ष हजर होते. तर नगरसेविका मंगला आढाव आणि मुरलीधर भामरे हे दोघे कौटुंबिक दुःखद कारणांमुळे उपस्थित राहू शकले नाहीत. मात्र, भामरे यांच्या मुलाने हजेरी लावून पक्षप्रमुखांसोबत असलेली निष्ठा जाहीर केली.

'ऑपरेशन तुडवा'चा थेट इशारा

» या पक्षांतराच्या चर्चांवर पडदा टाकण्यासाठी ठाकरेंच्या नगरसेवकांनी एकत्र येत पत्रकार परिषद घेतली आणि आपली वज्रमूठ दाखवली. 'आमचा एकही नगरसेवक फुटणार नाही, आम्ही सर्वजण निष्ठावंत आहोत,' असा दावा करत, 'ज्याप्रमाणे खासदार फुटले तेव्हा 'ऑपरेशन तुडवा' राबवण्यात आले, तसेच आता 'ऑपरेशन तुडवा' राबविणार,' असा थेट इशारा गटनेत्यांनी विरोधकांना दिला आहे.



उद्धव ठाकरेंचे 18 एप्रिलला रामरक्षा आंदोलन

प्रतिनिधी ११ जुलै

मुंबई : मुंबईत रामरक्षा आंदोलन केल्यानंतर आता नागपुरात आंदोलन शिवसेना ठाकरे पक्षाकडून करण्यात येणार असल्याची घोषणा खासदार संजय राऊत यांनी केली आहे. शिवसेनेने रामरक्षा आंदोलन जे सुरू केले त्याचा पहिला टप्पा मुंबईत पार पडला. दुसरा टप्पा महाराष्ट्राच्या उपराजधानीमध्ये १८ तारखेला साडेचार वाजता होईल. स्वतः शिवसेना पक्षप्रमुख, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे आणि असंख्य आमचे मुंबईतले नेते व विदर्भातले कार्यकर्ते यात सहभागी होतील, असे राऊत म्हणाले.

संजय राऊत म्हणाले, १८ जुलैला शिवसेना पक्षप्रमुख नागपूरला रामरक्षा आंदोलनात सहभागी होतील. राम मंदिर लूट प्रकरणामध्ये देशात असंतोष आहे, आजही मुख्य आरोपी पकडले गेले नाहीत, आजही लूट सुरू आहे.

हिंगोली जिल्ह्याला पुन्हा भूकंपाचा धक्का!

औंढा नागनाथ तालुक्यातील वसईत केंद्रबिंदू

प्रतिनिधी ११ जुलै

हिंगोली : जिल्ह्याला पुन्हा एकदा भूकंपाचा धक्का बसला आहे. आज ११ जुलैला सकाळी ११.२६ वाजण्याच्या सुमारास जिल्ह्याला भूकंपाचे हादरे जाणवले. या भूकंपाचा केंद्रबिंदू औंढा नागनाथ तालुक्यातील 'वसई' येथे असून, त्याची खोली ५ किलोमीटर असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून भूकंपाचे धक्के सातत्याने जाणवत आहेत. वसमत तालुक्यातील 'पांगरा शिंदे' येथे गेल्या आठ वर्षांपासून भूकंपाचे धक्के बसत असून, या धक्क्यांमुळे गावकरी दहशतीखाली आहेत. याआधी ८ जुलै रोजी मध्यरात्री जिल्हाभरात भूकंपाचे चार मोठे धक्के जाणवले होते, त्यानंतर संपूर्ण जिल्ह्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्या चारही भूकंपांचा केंद्रबिंदू वसमत तालुक्यातील 'पांगरा शिंदे' आणि औंढा नागनाथ तालुक्यातील 'काकडधाबा' परिसरात होता. विशेष म्हणजे, मागील काही वर्षांतील सर्वात मोठा ४.६ रिश्टर स्केलचा भूकंप ८ जुलैला नोंदवला गेला होता.

जिल्ह्यातील नागरिक आधीच्या धक्क्यांतून सावरत नाहीत तोच शनिवारी सकाळी ३.५ रिश्टर स्केलच्या तीव्रतेचा भूकंप झाला. पांगरा शिंदे, काकडधाबा आणि आता वसई येथे केंद्रबिंदू नोंदवल्या गेल्याने, भूकंपाचा केंद्रबिंदू हळूहळू सरकत असल्याची भीती जिल्हावासियांमध्ये निर्माण झाली आहे. दरम्यान, शनिवारी झालेल्या या भूकंपामुळे कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झालेली नाही. नागरिकांनी घाबरून न जाता अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

एकनाथ खडसे थेट मातोश्रीवर!

मुंबई : भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांच्या निवासस्थानी भेट दिल्यानंतर त्यांच्या भाजपमध्ये घरवापसी होण्याच्या चर्चांना मोठे उधाण आले होते. मात्र, या चर्चांदरम्यानच खडसे यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची मुंबईतील 'मातोश्री' निवासस्थानी भेट घेतल्याने राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे. विशेष म्हणजे, या भेटीदरम्यान खासदार संजय राऊत हेही उपस्थित होते. त्यामुळे खडसे यांच्या पुढील राजकीय भूमिकेबाबत विविध तर्क-वितर्क रंगू लागले आहेत.

महाराष्ट्रातील ६३ लाख शेतकऱ्यांना ऐतिहासिक कर्जमाफी !

अकोला पुर्वचे आमदार रणधीर सावरकर यांच्या प्रयत्नांना यश

शेतकरी कर्जमाफीमध्ये आ.सावरकरांचे मोठे योगदान आले समोर

प्रतिनिधी ११ जुलै

अकोला: शेतकऱ्यांच्या पाठीशी महायुती सरकार खंबीरपणे उभे अस र्जमुक्ती योजने'चा लाभ आता राज्यातील तब्बल ६३ लाख शेतकऱ्यांना मिळणार आहे. आमदार रणधीर सावरकर यांच्या नेतृत्वाखाली विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील आमदारांनी केलेल्या आग्रही मागणीला अखेर मुख्यमंत्र्यांनी हिरवा कंदील दाखवला आहे.

पावसाळी अधिवेशन २०२६ दरम्यान, भाजपचे माजी सरचिटणीस आणि विधिमंडळ प्रतोद आमदार रणधीर सावरकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांकडे शेतकऱ्यांनाच्या विविध मागण्यांचे निवेदन सादर केले होते. यामध्ये प्रामुख्याने सन २०१९ च्या महात्मा ज्योतिबा फुले कर्जमुक्ती योजनेतील शेतकऱ्यांचा मुद्दा लावून धरण्यात आला होता. २०१९ च्या योजनेतील १३ लाख थकबाकीदार शेतकऱ्यांना आधी केवळ ५० हजार रुपयांपर्यंतच लाभ मिळणार होता.

मात्र, आमदार सावरकरांच्या मागणीनंतर मुख्यमंत्र्यांनी ही मर्यादा वाढवून २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर केली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत आधीच ५० लाख शेतकऱ्यांना लाभ मिळत होता. आता या नवीन घोषणेमुळे एकूण ६३ लाख शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. सन २०२५-२६ आणि २०२६-२७ मधील पीक कर्जाच्या परतफेडीची अट देखील शासनाने शिथिल केली आहे, ज्यामुळे दुष्काळ आणि अतिवृष्टीने होरपळलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. २३ जून २०२६ रोजी सत्तारूढ पक्षाकडून मांडण्यात आलेल्या २९३ च्या प्रस्तावावर बोलताना आमदार रणधीर सावरकर यांनी शेतकरी, त्यांच्या व्यथा, विदर्भ-मराठवाड्यातील अवर्षण आणि जुलैच्या पहिल्या आठवड्यात झालेली अतिवृष्टी यावर सभागृहात प्रखर आवाज उठवला होता.

'अल निनो'च्या प्रभावामुळे पेरण्या रखडल्याची वस्तुस्थिती त्यांनी शासनासमोर मांडली होती. त्यांच्या याच अभ्यासू नेतृत्वाची दखल घेत महायुती सरकारने हा निर्णय घेतला.

सिटी न्यूज सुपरफास्ट
विविधा
२
शनिवार, दि. ११ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

राज्य शासनाची कर्जमुक्ती : शाश्वत कृषी विकासाचे धोरण

शेती ही महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून राज्यातील लाखो कुटुंबांच्या उपजीविकेचा मुख्य आधार आहे. मात्र, हवामानातील अनिश्चितता, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, वाढता उत्पादन खर्च, बाजारपेठेतील चढ-उतार आणि कर्जाचा वाढता बोजा यामुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडतात. अशा परिस्थितीत केवळ तात्पुरता दिलासा देणे पुरेसे नसून शेतकरी पुन्हा आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल, उत्पादनक्षम बनेल आणि भविष्यात कर्जाच्या दुष्टचक्रात अडकणार नाही, अशी दीर्घकालीन व्यवस्था उभी करणे आवश्यक ठरते. याच व्यापक दृष्टिकोनातून राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देणारी आणि सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांची ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित नसून शाश्वत कृषी विकासाच्या व्यापक धोरणाचा महत्त्वाचा भाग म्हणून पाहिली जात आहे. कर्जमुक्तीचा मूलभूत उद्देश शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देणे हा असला, तरी त्यामागील व्यापक विचार अधिक महत्त्वाचा आहे. कर्जमुक्त झालेला शेतकरी पुन्हा पतपुरवठ्यास पात्र होतो. नव्याने पीककर्ज उपलब्ध झाल्यामुळे तो वेळेवर बियाणे, खते, औषधे आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर करू शकतो. यामुळे उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होते आणि शेती अधिक सक्षम बनते. या योजनेतील सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे विविध प्रकारच्या शेतकऱ्यांचा विचार करण्यात आला आहे. दोन लाख रुपयांपर्यंतची थकीत कर्जे असलेल्या पात्र शेतकऱ्यांना थेट कर्जमुक्ती दिली जात आहे. त्याचबरोबर दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता (One Time Settlement - OTS) योजना उपलब्ध करून देण्यात आली आहे. अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर अशा शेतकऱ्यांनाही कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे मोठ्या कर्जबाजारी शेतकऱ्यांनाही आर्थिक पुनरुज्जीवनाची संधी उपलब्ध झाली आहे. शासनाने नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचाही विशेष विचार केला आहे. त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे आर्थिक शिस्त, वेळेवर कर्जफेड आणि बँकिंग व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होण्यास मदत होईल. ही बाब शाश्वत वित्तीय व्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जाते.योजनेची संपूर्ण अंमलबजावणी डिजिटल माध्यमातून केली जात आहे. महाआयटीच्या प्रणालीद्वारे आधार प्रमाणीकरण, ऑनलाइन पडताळणी, बँकांची संगणकीय माहिती आणि थेट लाभ वितरणामुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक, वेगवान आणि विश्वासार्ह झाली आहे. लाभार्थ्यांच्या याद्या ग्रामपंचायत, बँका, विकास संस्था आणि आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. मोबाईल संदेशाद्वारे लाभार्थ्यांना माहिती देण्याची तसेच तक्रार निवारणाची स्वतंत्र यंत्रणाही उभारण्यात आली आहे. यामुळे प्रशासनातील पारदर्शकता आणि लोकांचा विश्वास अधिक बळकट होईल. शाश्वत कृषी विकासाचा विचार केवळ कर्जमुक्तीपर्यंत मर्यादित राहत नाही. राज्य शासनाचे उद्दिष्ट शेतकऱ्यांना बारमाही सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून देणे, शेतीमालावर आधारित उद्योग-व्यवसायांना चालना देणे, कृषी प्रक्रिया उद्योगांचा विस्तार करणे, शेतीमालाला योग्य बाजारभाव मिळवून देणे, तातडीच्या पणन व्यवस्था विकसित करणे, वेळेवर पतपुरवठा सुनिश्चित करणे आणि ग्रामीण भागात आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे हे आहे. या सर्व बाबी परस्परपूरक असून त्यांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास आणि शेती अधिक लाभदायक होण्यास मदत होईल. सिंचनाचा विस्तार झाल्यास पावसावरील अवलंबित्व कमी होईल. आधुनिक तंत्रज्ञान, सूक्ष्म सिंचन, जलसंधारण आणि पीक नियोजन यामुळे उत्पादनात वाढ होईल. प्रक्रिया उद्योग उभारल्यास शेतीमालाला मूल्यवर्धन मिळेल आणि ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीला चालना मिळेल. सक्षम पणन व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळण्यास मदत होईल. या सर्व घटकांची सांगड कर्जमुक्तीशी घालण्यात आल्याने ही योजना शाश्वत कृषी विकासाच्या व्यापक आराखड्याचा भाग ठरते. आजच्या काळात हवामान बदल हे शेतीसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम, तांत्रिकदृष्ट्या आधुनिक आणि बाजारपेठेशी जोडलेला शेतकरी निर्माण करणे ही काळाची गरज आहे. कर्जमुक्तीमुळे निर्माण होणारे आर्थिक स्थैर्य, वेळेवर मिळणारा पतपुरवठा, आधुनिक शेती पद्धतींचा स्वीकार आणि मजबूत कृषी पायाभूत सुविधा या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे अधिक शाश्वत, सक्षम आणि स्पर्धात्मक कृषी व्यवस्था होय. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' ही त्यामुळे केवळ कर्जमाफीची योजना नाही. ती शेतकऱ्याला नव्याने उभारी देणारी, आर्थिक विश्वास पुनर्स्थापित करणारी, डिजिटल सुशासनाला चालना देणारी आणि कृषी क्षेत्राच्या दीर्घकालीन शाश्वत विकासाला दिशा देणारी योजना आहे. आर्थिक दिलासा, पतपुरवठा, सिंचन, आधुनिक तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग, बाजारपेठ आणि पायाभूत सुविधांचा समन्वय शेतकऱ्यांचे जीवन सुखी, समृद्ध आणि आत्मनिर्भर करण्याच्या व्यापक धोरणातील महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

प्रवीण टाके
उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय,
कोल्हापूर 9702858777

भारत कुटुंबनियोजन कार्यक्रम अधिकृतपणे सुरु करणारा पाहिला देश!

आज जागतिक लोकसंख्या दिन

भारताचे राष्ट्रीय लोकसंख्या धोरण हे देशातील लोकसंख्यावाढीचा वेग नियंत्रित करण्यासाठी, लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि शाश्वत विकास साधण्यासाठी तयार करण्यात आलेली एक महत्त्वाची सरकारी योजना आहे. १९५२ मध्ये अधिकृतपणे कुटुंब नियोजन कार्यक्रम सुरू करणारा भारत हा जगातील पहिला देश होता. सध्या भारतात 'राष्ट्रीय लोकसंख्या धोरण २०००' लागू आहे, ज्याचे स्वरूप पूर्णपणे ऐच्छिक आणि मानवी हक्कांवर आधारित आहे. या धोरणाची तीन प्रमुख उद्दिष्टे आहेत. १) तात्कालिक उद्दिष्ट : गर्भनिरोधक साधनांची कमतरता दूर करणे, आरोग्य पायाभूत सुविधा मजबूत करणे आणि माता-बाल आरोग्यासाठी एकात्मिक सेवा उपलब्ध करून देणे. २) मध्यमकालीन उद्दिष्ट : एकूण जननदर २.१ च्या प्रतिस्थापन पातळीवर आणणे. (भारताने बहुतांश राज्यांमध्ये हे उद्दिष्ट यशस्वीपणे साध्य केले आहे). ३) दीर्घकालीन उद्दिष्ट : आर्थिक वाढ, सामाजिक विकास आणि पर्यावरण संरक्षणाशी सुसंगत होईल अशा रीतीने लोकसंख्या स्थिर करणे.

धोरणाची मुख्य वैशिष्ट्ये आणि लक्ष्य 'हम दो, हमारे दो' चा प्रसार : लहान कुटुंबाच्या आदर्शाला प्रोत्साहन देणे. बालमृत्यू दर कमी करणे : दर हजारी जिवंत जन्मांमागे बालमृत्यूचे प्रमाण ३० पेक्षा कमी करणे. माता मृत्यू दर घटवणे : प्रति १ लाख जिवंत जन्मांमागे माता मृत्यूचे प्रमाण १०० पेक्षा कमी करणे. १४ वर्षांपर्यंतच्या मुलांना मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण देणे आणि शाळेतील गळतीचे प्रमाण रोखणे. मुलींचे लग्नाचे वय १८ वर्षांपेक्षा जास्त (शक्यतो २० वर्षे) ठेवण्यास प्रोत्साहन देणे. जन्म, मृत्यू, विवाह आणि गरोदरपणाची १०० टक्के नोंदणी बंधनकारक करणे. आणीबाणीच्या काळातील (१९७६ च्या धोरणातील) सक्तीच्या नसबंदीसारख्या उपायांना पूर्णपणे वगळून, हे धोरण लोकांच्या ऐच्छिक निवडीवर सोडण्यात आले आहे.

पहिल्या कुटुंब नियोजन कार्यक्रमाची सुरुवात.१९७६ : पहिले अधिकृत राष्ट्रीय लोकसंख्या धोरण जाहीर झाले, ज्यामध्ये आणीबाणी दरम्यान सक्तीच्या कुटुंब नियोजनावर भर दिला गेला होता. नवीन सरकारने जुन्या धोरणातील सक्ती रद्द करून त्याचे नाव 'कुटुंब कल्याण कार्यक्रम' केले. २०००: अटलबिहारी वाजपेयी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय लोकसंख्या आयोगाची स्थापना झाली आणि सध्याचे सर्वसमावेशक धोरण लागू करण्यात आले.

जागतिक लोकसंख्या दिन दरवर्षी ११ जुलै रोजी जगभरात साजरा केला जातो. वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण होणाऱ्या समस्या, आरोग्य, कुटुंब नियोजन, गरिबी आणि मानवी हक्क याविषयी जनजागृती करणे हा या दिनाचा मुख्य उद्देश आहे.

११ जुलै १९८७ रोजी जगाची लोकसंख्या ५ अब्ज (५०० कोटी) झाली होती. या वाढत्या लोकसंख्येविषयी लोकांचे लक्ष वेधण्यासाठी आणि जाणीव जागृती करण्यासाठी संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या गव्हर्निंग कौन्सिलने १९८९ मध्ये ११ जुलै हा दिवस 'जागतिक लोकसंख्या दिन' म्हणून घोषित केला. अधिकृतपणे पहिला जागतिक लोकसंख्या दिन ११ जुलै १९९० रोजी साजरा करण्यात आला. सतत वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे अन्न, पाणी, निवारा आणि रोजगारावर प्रचंड ताण येतो. लोकांना कुटुंब नियोजनाचे महत्त्व पटवून देणे हा याचा मुख्य हेतू आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे आरोग्य सेवा आणि शिक्षणाचा दर्जा खालावू नये, यासाठी योग्य उपाययोजनांवर चर्चा केली जाते. समाजात मुलगा-मुलगी असा भेद न बाळगता लिंग समानतेला प्रोत्साहन देणे.

सध्या जगाची लोकसंख्या ८.३ अब्जांपेक्षा जास्त झाली आहे. भारताची लोकसंख्या जगात सर्वाधिक (सुमारे १.४६ ते १.४८ अब्ज) आहे. जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त दरवर्षी एक विशेष संकल्पना ठरवली जाते, ज्यामध्ये तरुणांचे सक्षमीकरण आणि शाश्वत विकासावर भर दिला जातो.

जागतिक लोकसंख्या दिन हा एक वार्षिक कार्यक्रम आहे, ज्याचा उद्देश जागतिक लोकसंख्या समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे आहे. हा कार्यक्रम १९८९ मध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या नियामक परिषदेने स्थापित केला होता. ११ जुलै, १९८७ रोजीच्या 'फाइव्ह बिलियन डे' मधील लोकांच्या स्वारस्यातून याला प्रेरणा मिळाली. ज्या दिवशी जगाची लोकसंख्या अंदाजे पाच अब्ज लोकांपर्यंत पोहोचली होती. जागतिक लोकसंख्या दिनाचा उद्देश कुटुंब नियोजनाचे महत्त्व, लैंगिक समानता , गरिबी, मातांचे आरोग्य आणि मानवाधिकार यांसारख्या विविध लोकसंख्या समस्यांबद्दल लोकांमध्ये जागरूकता वाढवणे आहे. जागतिक बँकेत वरिष्ठ लोकसंख्याशास्त्रज्ञ म्हणून काम करत असताना डॉ. के. सी. झकेरिया यांनी हा दिवस सुचवला होता, ज्या दिवशी लोकसंख्या पाच अब्ज झाली. जागतिक लोकसंख्येमध्ये अब्जावधींच्या वाढीसह माध्यमांचे स्वारस्य आणि सामान्य जागरूकता वाढत असताना, जगाची लोकसंख्या अंदाजे दर १४ महिन्यांनी १०० दशलक्षांनी वाढते. ६ फेब्रुवारी २०१६ रोजी जगाची लोकसंख्या ७,४००,०००,००० असल्याचा अंदाज होता आणि २४ एप्रिल २०१७ रोजी ती ७,५००,०००,००० वर पोहोचली. २०१९ मध्ये जगाची लोकसंख्या ७,७००,०००,००० वर पोहोचली. नोव्हेंबर २०२० मध्ये, यूएनएफपीएने केनिया आणि डेन्मार्कच्या सरकारांसोबत मिळून , ही अपूर्ण उद्दिष्टे साध्य करण्याच्या प्रयत्नांना गती देण्यासाठी नैरोबी येथे एक उच्चस्तरीय परिषद आयोजित केली. जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त, जगभरातील समथ&क नेते, धोरणकर्ते&, तळागाळातील संघटक, संस्था आणि इतरांना सवां&साठी प्रजनन आरोग्य आणि हक्क प्रत्यक्षात आणण्यास मदत करण्याचे आवाहन करतात. अलीकडेच, १५ नोव्हेंबर २०२२ रोजी जागतिक लोकसंख्या ८ अब्ज ओलांडली. महाराष्ट्राची लोकसंख्या सध्या देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. आथि&क पाहणी अहवाल २०२५-२६ च्या सरकारी आकडेवारीनुसार, राज्याची एकूण लोकसंख्या अंदाजे १२.९३ कोटी इतकी झाली आहे.

कसोटी क्रिकेटमध्ये दहा हजार धावांचा टप्पा ओलांडणारे पहिले फलंदाज!



सुनील मनोहर गावस्कर यांचा जन्म १० जुलै १९४९ रोजी झाला. ते एक भारतीय क्रिकेट समालोचक आणि माजी क्रिकेटपटू आहेत. त्यांनी १९७१ ते १९८७ या काळात भारत आणि मुंबईचे प्रतिनिधित्व करताना भारतीय राष्ट्रीय क्रिकेट संघाचे कर्णधारपद भूषवले. कसोटी क्रिकेटमध्ये १०,००० धावांचा टप्पा ओलांडणारे ते पहिले फलंदाज होते. गावस्कर यांना सर्वकालीन महान सलामीच्या फलंदाजांपैकी एक म्हणून ओळखले जाते.

वेगवान गोलंदाजीविरुद्धच्या तंत्रासाठी गावस्कर यांची मोठ्या प्रमाणावर प्रशंसा केली जात असे. वेस्ट इंडिजविरुद्ध त्यांची सरासरी ६५.४५ इतकी विशेषत: उच्च होती. वेस्ट इंडिजकडे चार वेगवान गोलंदाजांचे आक्रमण होते, जे कसोटी इतिहासातील सर्वात घातक मानले जात होते. तथापि, वेस्ट इंडिजविरुद्ध गावस्कर यांची बहुतेक शतके तेव्हाची होती, जेव्हा त्यांचे चार गोलंदाज एकत्र खेळत नव्हते. भारतीय संघाचे त्यांचे कर्णधारपद हे सुरुवातीच्या आक्रमक कर्णधारपदांपैकी एक मानले जाते, ज्या अंतर्गत भारतीय संघाने १९८४ चा आशिया कप आणि १९८५ मध्ये क्रिकेट विश्वचषक जिंकला. त्याच वेळी, गावस्कर आणि कपिल देव यांच्यात कर्णधारपदाची अनेकदा अदलाबदल झाली, त्यापैकी एक अदलाबदल कपिल देव यांनी भारताला १९८३ च्या क्रिकेट विश्वचषकात विजय मिळवून देण्याच्या अवघ्या सहा महिने आधी झाली होती. ते मुंबईचे माजी शेरीफ देखील आहेत. गावस्कर यांना भारतीय क्रीडा सन्मान अर्जुन पुरस्कार आणि नागरी सन्मान पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे . २००९ मध्ये त्यांना आयसीसी क्रिकेट हॉल ऑफ फेममध्ये समाविष्ट करण्यात आले. २०१२ मध्ये, त्यांना सीके नायडू जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, जो बीसीसीआय माजी खेळाडूला देऊ शकणारा सर्वोच्च सन्मान आहे.मुंबईत एका मध्यमवर्गीय मराठी कुटुंबात जन्मलेले आणि सेंट झेवियर्स हायस्कूलचे विद्यार्थी असलेले तरुण सुनील गावस्कर, शाळेकडून खेळत असताना १९६६ मध्ये 'भारताचे सर्वोत्कृष्ट शालेय क्रिकेटपटू' म्हणून गौरवले गेले. माध्यमिक शिक्षणाच्या शेवटच्या वर्षात शालेय क्रिकेटमध्ये त्यांनी २२२ आणि ८५ धावा केल्या आणि त्यानंतर दौऱ्यावर आलेल्या लंडनच्या शालेय मुलांविरुद्ध शतक झळकावले. त्यांनी १९६६-६७ मध्ये डुंगरपूरच्या संघाविरुद्ध वझीर सुलतान कोल्ट्स इलेव्हनकडून प्रथम-श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले, परंतु पुढील दोन वर्षे ते मुंबईच्या रणजी ट्रॉफी संघात एकही सामना न खेळता राहिले. मुंबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजचे माजी विद्यार्थी असलेल्या त्यांनी १९६८-६९ हंगामात कर्नाटकविरुद्ध पदार्पण केले , पण ते शून्यावर बाद झाले . मुंबईच्या निवड समितीवर त्यांचे काका, भारताचे माजी कसोटी यष्टीरक्षक माधव मंत्री , यांच्या उपस्थितीमुळे त्यांची निवड झाली, असे उपहासात्मक आरोप त्यांच्यावर झाले. त्यांनी आपल्या दुसऱ्याच सामन्यात राजस्थानविरुद्ध ११४ धावा करून प्रत्युत्तर दिले आणि त्यानंतरच्या सलग दोन शतकांमुळे १९७०-७१ मध्ये वेस्ट इंडिज दौऱ्यासाठी भारतीय संघात त्यांची निवड झाली.

नखांच्या संसर्गामुळे पहिली कसोटी चुकवल्यानंतर, गावस्कर यांनी पोर्ट-ऑफ-स्पेन , त्रिनिदाद येथे झालेल्या दुसऱ्या कसोटीत ६५ आणि ६७ धावा नाबाद केल्या आणि विजयी धावा करून भारताला वेस्ट इंडिजवर पहिला विजय मिळवून दिला. यानंतर त्याने गयानाच्या जॉर्जटाऊन येथे झालेल्या तिसऱ्या कसोटीत आपले पहिले शतक (११६ आणि ६४) आणि बार्बाडोसच्या ब्रिजटाऊन येथे झालेल्या चौथ्या कसोटीत १ आणि ११७ धावा केल्या. तो पाचव्या कसोटीसाठी त्रिनिदादला परतला आणि त्याने १२४ व २२० धावा करून भारताला वेस्ट इंडिजविरुद्ध पहिला मालिका विजय मिळवून दिला, जो २००६ पर्यंतचा एकमेव विजय होता. या कसोटीतील त्याच्या कामगिरीमुळे तो डग वॉल्टर्सनंतर एकाच सामन्यात शतक आणि द्विशतक झळकावणारा दुसरा खेळाडू ठरला. जुलै २०२५ मध्ये एडजबॅस्टन येथे इंग्लंडविरुद्ध शुभमन गिलने याची पुनरावृत्ती करेपर्यंत हा पराक्रम करणारा तो एकमेव भारतीय होता. तो एकाच कसोटी मालिकेत चार शतके करणारा पहिला भारतीय, विजय हजारे यांच्यानंतर एकाच कसोटीत दोन शतके करणारा दुसरा भारतीय आणि हजारे व पॉली उम्रीगर यांच्यानंतर सलग तीन डावांमध्ये शतके करणारा तिसरा खेळाडू ठरला. एका मालिकेत ७०० पेक्षा जास्त धावा करणारा तो पहिला भारतीय होता आणि आजपर्यंत असे करणारा तो एकमेव भारतीय आहे. १५४.८० च्या सरासरीने केलेल्या त्याच्या ७७४ धावा, कोणत्याही फलंदाजाने पदार्पणाच्या मालिकेत केलेल्या सर्वाधिक धावा आहेत. त्रिनिदादचे कॅलिप्सो गायक लॉर्ड रेलेटर (विलार्ड हॅरिस) यांनी गावस्कर यांच्या सन्मानार्थ 'गावस्कर कॅलिप्सो ' हे गाणे लिहिले. १९७१ मध्ये तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी इंग्लंडमध्ये दाखल झालेल्या गावस्कर यांच्या पदार्पणाच्या मालिकेमुळे त्यांना मोठी प्रसिद्धी मिळाली. ते आपली कामगिरी कायम ठेवू शकले नाहीत आणि त्यांनी केवळ दोन अर्धशतके झळकावली. जॉन स्नोच्या गोलंदाजीवर एक धाव घेताना ते वादात सापडले. त्यांची टक्कर झाली आणि गावस्कर खाली पडले. स्नोवर गावस्कर यांना जाणूनबुजून धडक दिल्याचा आरोप ठेवण्यात आला आणि त्याला निलंबित करण्यात आले. गावस्कर यांच्या २४ च्या कमी सरासरीने केलेल्या १४४ धावांमुळे काहींनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटसाठी त्यांच्या पात्रतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

१९७२-७३ मध्ये, इंग्लंडने पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी भारताचा दौरा केला, जो गावस्कर यांचा मायदेशातील पहिलाच दौरा होता. पहिल्या तीन कसोटी सामन्यांमध्ये ते निष्प्रभ ठरले, पाच डावांमध्ये त्यांनी केवळ साठ धावा जमवल्या आणि भारताने २-१ अशी आघाडी घेतली. शेवटच्या दोन कसोटी सामन्यांमध्ये त्यांनी काही धावा केल्या, जे सामने भारताने अनिर्णित राखले आणि इंग्लंडवर सलग मालिका विजय मिळवला. त्यांची पहिली मायदेशातील मालिका मोठ्या प्रमाणात निराशाजनक ठरली, ज्यात त्यांनी २४.८९ च्या सरासरीने २२४ धावा केल्या. १९७४ मध्ये जेव्हा भारत परतला, तेव्हा त्यांच्या इंग्लिश टीकाकारांचे समाधान झाले आणि गावस्कर यांनी ओल्ड ट्रॅफर्ड येथील पहिल्या कसोटीत १०१ आणि ५८ धावा केल्या. त्यांनी ३७.८३ च्या सरासरीने २२७ धावा केल्या, पण भारताचा ३-० असा व्हाईटवॉश झाला. गावस्कर यांची वेस्ट इंडिजविरुद्धची १९७४-७५ ची मालिका खंडित झाली, ते वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेतील फक्त पहिला आणि पाचवा व अंतिम कसोटी सामना खेळले. त्यांनी २७ च्या सरासरीने १०८ धावा केल्या, ज्यात मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर झालेल्या पहिल्या कसोटीत लान्स गिब्सच्या गोलंदाजीवर केलेल्या ८६ धावांचा समावेश होता, जे भारतीय जनतेला शतक पाहण्याच्या सर्वात जवळचे दृश्य होते. ही कसोटी १०६ कसोटी सामन्यांच्या जागतिक विक्रमी मालिकेची सुरुवात होती.

श्री संत वासुदेव महाराज पायीवारीत गावोगावी वृक्षारोपण

वारीत यंदा भक्तीबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश दिला जात आहे. संस्थेचे सर्व पदाधिकारी व विश्वस्त अनिल कोरपे यांच्या संकल्पनेतून वारी मार्गावरील प्रत्येक गावात वृक्षारोपणाचा अभिनव उपक्रम राबविण्यात येत असून, हा उपक्रम महाराष्ट्रातील वारी परंपरेत एक आगळावेगळा आदर्श ठरत आहे. श्रीक्षेत्र तिधारा (जि. हिंगोली) येथे स्थानिक तरुणांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी पर्यावरण संरक्षणाची सामूहिक जबाबदारी अधोरेखित करत युवकांना निसर्गसंवर्धनाची प्रेरणा देण्यात आली.

वारीच्या मार्गावरील प्रत्येक गावात किमान पाच वृक्षांची लागवड करून त्यांच्या संवर्धनाची जबाबदारीही स्थानिक नागरिकांकडे सोपविण्यात येत आहे. आतापर्यंत अनेक वृक्षांची लागवड करण्यात आली असून, संत तुकाराम महाराजांच्या "वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे" या अभंगातील विचार प्रत्यक्ष कृतीतून साकार होत आहेत.

अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घालून समाजपरिवर्तन घडविण्याचा संदेश संतांनी दिला आहे. त्याच विचारधारेचा स्वीकार करत श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था भक्ती, सेवा आणि पर्यावरण संवर्धन यांचा सुंदर संगम घडवत आहे. लोकसहभागातून राबविण्यात येणारे हे हरित अभियान पंढरपूरपर्यंत अखंड सुरू राहणार असून, प्रत्येक गावात पर्यावरणाबाबत जनजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या उपक्रमामागील प्रमुख प्रेरणास्थान असलेले 'पाणीदार माणूस' अनिल कोरपे यांनी वृक्षारोपणाला जनआंदोलनाचे स्वरूप दिले आहे. त्यांच्या पर्यावरणप्रेमी कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, भविष्यातही त्यांच्या हातून अशीच समाजोपयोगी आणि पर्यावरणपूरक सेवा घडत राहो, अशी भावना वारकरी, ग्रामस्थ आणि पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली. इतरही वारकरी मंडळांनी अशा प्रकारचा उपक्रम राबवल्यास पर्यावरणावर हातभार लागू शकतो.

गजानन हरणे,
खडकी अकोला.

ईश्वरविषयक तात्त्विक माहिती घेण्यापूर्वी साधना सुरु करणे महत्त्वाचे

अनेक जण ईश्वरविषयक काही तत्त्वज्ञान सांगणाऱ्या ग्रंथांचे वाचन करत असतात. पैकी बऱ्याच जणांना साधना म्हणजे काय, याचीच कल्पनासुद्धा नसते. 'साधना म्हणजे ईश्वरप्राप्तीसाठी जाणीवपूर्वक प्रतिदिन काया-वाचा-मन यांच्या माध्यमातून करायच्या कृती.' ईश्वरविषयक तात्त्विक माहिती घेण्याच्या आधी साधना चालू करणे का महत्त्वाचे ? तसेच कुणी आवडते म्हणून ईश्वरविषयक तात्त्विक माहितीचे वाचन करत असतील, तर त्यांनीसुद्धा तत्परतेने साधना का चालू करावी, हे स्पष्ट करण्यासाठी हा लेख ! ९ जुलै या दिवशी प्रसिद्ध झालेल्या लेखात आपण 'व्यवहारज्ञान अन् शिक्षणशास्त्र काय सांगते ?', यांविषयी वाचून 'आधुनिक विज्ञानाचे वैशिष्ट्य आणि ईश्वरप्राप्तीचे शास्त्र' यांतील काही सूत्रे वाचली. आज या लेखाचा अंतिम भाग येथे देत आहोत. आधुनिक विज्ञानाचे वैशिष्ट्य आणि ईश्वरप्राप्तीचे शास्त्र यातील प्रस्थानत्रयी काय सांगते ? : प्रस्थानत्रयी, म्हणजे उपनिषद, ब्रह्मसूत्र, गीता हे ३ ग्रंथ. हे सनातन धर्माच्या तत्त्वज्ञानाचे पायाभूत ग्रंथ आहेत. यातील ब्रह्म, माया, ईश्वर इत्यादीविषयींची सूत्रेच पुढे त्यानंतरच्या आजतागायतच्या विविध ग्रंथांतून या ना त्या प्रकारे आली आहेत.

उपनिषदांमधील कथांमध्ये वेगवेगळ्या प्रकारे शिष्याकडून गुरु प्रथम काही ठोस कृती करून घेतांना दिसतात. उदा. या १०० गायी घेऊन जा, त्यांचा योग्य सांभाळ कर. त्या १००० झाल्या की, तुला कुणी येऊन ज्ञान देईल. त्या आणखी १०० पट झाल्या की, पुढचे ज्ञान कुणी तरी देईल इत्यादी. आता हे म्हणजे साधना करणे झाले.

उपनिषदांच्या अध्ययनातून आत्मा, ब्रह्म इत्यादी संबंधाने मनात काही गोंधळ असेल, तर तो दूर करण्यासाठी हा ग्रंथ आहे. त्यातील सूत्रांमधील पहिलेच सूत्र 'अथातो ब्रह्मजिज्ञासा' हे आहे. या सूत्राचा ध्वनीत आशय हा आहे की, जे योग्य साधनेच्या आधारे अंत:करण शुद्धी करून जे सिद्ध आहेत, ते यानंतर पुढे दिलेले ब्रह्मविषयक विवरण समजून घेण्याचे अधिकारी आहेत.

भगलदगीतेत अर्जुनाने सर्वश्रेष्ठ सत्य कोणते आणि ते साध्य होण्यासाठी समोर दिसणाऱ्या आप्तजनांशी युद्ध करून त्यांना मारणे योग्य कि संन्यास घेऊन ज्ञानप्राप्ती योग्य ? या मनातील द्वंद्वासंबंधी विचारल्यानंतर श्रीकृष्णाने त्याला प्रथम सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञानाचा गाभा सांगितला. अर्जुनाला काहीही समजले नाही. मग श्रीकृष्णाने 'प्रथम कर्म म्हणजे युद्ध कर, त्याखेरीज ज्ञानप्राप्ती संभव नाही', असे सांगितले. 'गीतेमध्ये परत परत दोष घालवावेत, गुण बाणवावेत, तरच ईश्वरप्राप्ती शक्य आहे', हे तर सांगितलेच आहे. यासह ईश्वरप्राप्तीच्या वाटेने जायचे, तर ईशकृपा महत्त्वाची आहे, हेही

सांगितले आहे. त्यासाठी आधी नामजपादी योग्य साधना करावी लागते.

तात्त्विक वाचनाच्या इच्छेमागील मूळ उर्मीचा अभ्यास : वरील विवरण वाचूनही एखाद्याला केवळ तात्त्विक माहिती वाचावी, असे वाटते, तर त्यात काय चुकीचे ? अन्य काही तरी वाचण्यापेक्षा तात्त्विक अध्यात्म वाचणे चांगले नाही का ? असे प्रश्न काहींना असू शकतात.

अध्यात्मावरील तात्त्विक ग्रंथांचे वाचन करण्याच्या प्रेरणेचा मूळ स्रोत : तात्त्विक ग्रंथ वाचण्यामागे तशी इच्छा वगळता अन्य काही कारण असते का ? याचा तसेच जे कारण असेल, त्याचे स्वरूप काय, याचा विचार वाचकाने करायला हवा. येथे इच्छा, उर्मी आणि स्फुरण या ३ संज्ञा येतात. इच्छा, उर्मी आणि स्फुरण : जेव्हा कुणाला काही करावेसे वाटते, याला 'इच्छा' म्हणतात. प्रत्येक इच्छेच्या मागे स्वतःच्या अंतर्यामी काहीतरी कारण असते. ते कारण, म्हणजे त्या इच्छेला जन्म देणारी 'उर्मी (वृत्ती)'. येथे इच्छा ही जाणिवेच्या स्तरावर असते. ती म्हणजे नेमके काय, ते शब्दात सांगता येते. त्यामुळे तिच्या आधारे ती कृतीही होते. या तुलनेत उर्मी तितकीशी जाणिवेच्या स्तरावर नसते. त्यामुळे उर्मीचे स्वरूप समजून घेणे तितकेसे सोपे नाही. काही असले, तरी उर्मीच इच्छेला जन्म देत असते. उर्मी संबंधित इच्छेच्या तुलनेत सूक्ष्म असते. स्फुरण तर अतीअतीसूक्ष्म आहे. स्फुरणाविषयी या टप्प्याला केवळ अंतर्यामी असणारी 'मी'ची जाणीव जिच्या आधारे अनेक उर्मी जन्म घेतात, हे एवढे समजणे पुरेसे आहे.

तात्त्विक ग्रंथांचे वाचन करावे, या इच्छेमागील उर्मी कोणती ? : तात्त्विक माहिती वाचावी, ही इच्छा अन्य काहीतरी वाचण्यापेक्षा अधिक सात्त्विक आहे, हे नक्कीच; परंतु त्यामागील आंतरिक उर्मीचा वेध घेण्यासाठी थोडा नीट विचार आणि स्वनिरीक्षण केल्यास लक्षात येते की, वाचत असलेल्या तात्त्विक ग्रंथात ज्याविषयी (म्हणजे संक्षेपात ईश्वराविषयी) सांगितले गेले आहे, त्याविषयी आपल्याला अंतर्यामी आवड अन् प्रेम असते. ही उर्मी त्यासंबंधी काही 'वाचन करूया', याप्रकारे मनात इच्छारूपाने व्यक्त झालेली असते. त्यामुळे ते वाचावेसे वाटते आणि वाचले की, छान वाटते. असे असले, तरी ही मनाची स्थिती सर्वकाळ टिकून रहात नाही. येथे इच्छेची पूर्तता कदाचित् झाली असेल; परंतु उर्मीची पूर्तता झाली नाही, हे लक्षात घ्यावे. ती होण्यासाठी उर्मीचे खरे स्वरूप समजून घ्यावे.

उर्मीचे खरे स्वरूप : ईश्वरविषयीची तात्त्विक माहिती वाचायची इच्छा होणारे एका अर

सिटी न्यूज अकोला
शनिवार, दि. ११ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचा होणार कायापालट!

धर्मादाय संस्थेची मिळाली मान्यता, सामाजिक उत्तरदायित्व पार पाडण्याचा मार्ग मोकळा

अकोला : स्थानिक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय व सुपर स्पेशालिटी रुग्णालय यांना आयकर अधिनियम, १९६१ अंतर्गत कलम १२ एबी व कलम ८० जी अंतर्गत आवश्यक नोंदणी व गान्यता प्राप्त झाली. या मान्यतेमुळे उद्योग समूह, सार्वजनिक उपक्रम, कॉर्पोरेट संस्था, सेवाभावी संस्था तसेच दानशूर व्यक्तींना संस्थेस सीएसआर निधी अथवा देणगीच्या स्वरूपात रुग्णोपयोगी साहित्य देण्याचा मार्ग गोकळा झाला आहे. तसेच त्यांना आयकरातून सवलत मिळणार असल्याने लोकसहभाग वाढून महाविद्यालय, रूग्णालयाचा कायापालट होणार आह. तसेच महाविद्यालय व रुग्णालयाच्या सुविधा व गुणवत्तेचा दर्जा सुधारण्यास मदत होणार आहे.

शहरात २००२ मध्ये स्थापन झालेले शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे विदर्भातील महत्त्वाचे वैद्यकीय शिक्षण व

आरोग्य सेवा केंद्र असून सन २०२४ पासून सुपर स्पेशालिटी रुग्णालयाची सेवाही सुरू झाली आहे. दररोज हजारो रुग्ण येथे उपचारासाठी येतात. अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सीएसआर निधी व लोकसहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. आता धर्मादाय संस्थेची मान्यता मिळाल्यामुळे अत्याधुनिक यंत्रसामग्री प्राप्त होण्याचा मार्ग सुकर झाला आहे. अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध होतील. यामध्ये हेंटिलेटर, आयसीयु मॉनिटर्स डायलिसिस मशिन, पोर्टेबल एक्स-रे, अल्ट्रासोनोग्राफी व इतर आवश्यक उपकरणे आदी अत्याधुनिक उपकरणांमुळे आजारांचे लवकर निदान होऊन गंभीर रुग्णांवर तातडीने उपचार करणे शक्य होणार आहे. तसेच आयसीयू व आपत्कालीन सेवांची गुणवत्ता वाढेल, आपत्कालीन परिस्थितीत उपचार क्षमता वाढेल. तसेच सीएसआर प्रकल्पांतून औषधे, सर्जिकल साहित्य, व्हीलचेअर, स्ट्रेचर, इन्फ्युजन पंप आदी उपलब्ध करून देता येतात. रुग्ण व नातेवाईकांसाठी सुविधा प्रतीक्षालय, स्वच्छ पिण्याचे पाणी, बसण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, डिजिटल माहिती प्रणाली यांसारख्या सुविधा विकसित करता येणार आहेत. एकूण आरोग्य सेवेची गुणवत्ता उंचाणार आहे. त्यामुळे शासकीय रुग्णालयातील सेवा अधिक परिणामकारक, सुरक्षित व रुग्णकेंद्रित बनणार आहे.

अ.भा.वि.प.च्या स्थापना दिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

अकोला : अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या स्थापना दिनानिमित्त तसेच राष्ट्रीय विद्यार्थी दिनाच्या औचित्याने अकोला महानगरात गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अँड. गिरीश गोखले , प्रमुख वक्त्या म्हणून विदर्भ प्रांत सहमंत्री कु. रिदम शाह उपस्थित होत्या. यावेळी अ.भा.वि.प.चे महानगराध्यक्ष प्रा. दिलीप बांगर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविकात प्रा. दिलीप बांगर यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या स्थापना दिनाचे महत्त्व, विद्यार्थी परिषदेचे विविध क्षेत्रांतील कार्य, विद्यार्थी हितासाठी सातत्याने राबविण्यात येणारे उपक्रम आणि राष्ट्रनिर्माणासाठी कार्यकर्त्यांचे योगदान याविषयी मार्गदर्शन केले. तसेच सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यानंतर अकोला महानगरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये श्रेया पाटील (१००% गुण), ईशान आडे, तेजल भागवत, संस्कृती हरणे, प्रांजली महल्ले, सिद्धी राठी, आनंदी पाटील, आर्या विरोकार, भक्ती वाघमारे, नंदिनी पारस्कर, शिवम गोरे, सार्थक दांडळे, शंतनू कसूर, श्रद्धा काटे, आदिनाथ सोनवणे, प्रेम राऊत, शिव अग्रवाल, तेजस जयंती, श्रुती घोगरे, मेधावी वाकडे, देविका देशमुख, वेदिका देशमुख, गायत्री येवले, श्रावणी राजवैद्य, ऋतुजा मुकोकार, गौरव पोटले, योगिनी जायले, संचिता जाधव, अशिता अग्रवाल, गौरी पाचपोर, श्रेयस पाटील, वीर राठोड, गौरी घटले, अवनीश देशपांडे, देवांशी गावंडे, अनुश्री झाडोकार, श्रावणी पाटील, पियुष बोरकर, समीक्षा उगले, अक्षदा राठोड, जानवी ढोरे, समृद्धी भांडारकर, संचित फाटे, अनिकेत खैरे, आदित्य डोंगरे, नंदिनी पोयाम, तन्वी वाघमारे सिद्धेश वाडकर आदी विद्यार्थ्यांचा समावेश होता. यावेळी विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात अँड . गिरीश गोखले यांनी विद्यार्थी परिषदेमधील आपल्या विद्यार्थी जीवनातील अनुभव सांगितले. विद्यार्थी परिषदेमुळे नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रभक्तीची जाणीव अधिक दृढ झाली, असे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच समाजकार्य, राष्ट्रप्रेम, शिस्त आणि गुरुजन तसेच पालकांच्या मार्गदर्शनाचा स्वीकार करून जीवनात निश्चित ध्येय ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले. अ.भा.वि.प. ही विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्य करणारी आणि विद्यार्थ्यांना नेतृत्वाची संधी देणारी संघटना असल्याचे त्यांनी सांगितले. प्रमुख वक्त्या कु. रिदम शाह यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या विविध आयामांची माहिती देत स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर प्रकाश टाकला. यावेळी राष्ट्रीय कला मंचाचे प्रांत प्रमुख अविनाश तोडसाम महानगर उपाध्यक्ष प्रा. महेश भवाने, प्रा. श्रीकांत पाटील, प्रांत सहमंत्री चंद्रकांत बोबडे, तेजस्विनी रणपिसे, प्रथमेश डाकरे, ऋषी पिंजरकर, प्रणव धारवेकर, अथर्व वारकरी, हर्ष तायडे, तनय धानखेडे यांच्यासह विद्यार्थी, पालक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजस्विनी रणपिसे यांनी केले, तर आभार प्रदर्शन नगरमंत्री परीक्षित कोल्हे यांनी केले. वंदे मातरम् गायनाने कार्यक्रमाची सांगता उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

खाटूवाले श्यामच्या भक्तिरसात रंगले भाविक

योगिनी एकादशीनिमित्त श्री श्याम बाबांच्या आकर्षक शृंगार दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी

प्रतिनिधी १० जुलै

अकोला : शहरातील गीता नगर परिषद परिसरातील श्री रामदेव बाबा व श्री श्याम बाबा मंदिरात योगिनी एकादशीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळी श्री श्याम बाबांचा अभिषेक, पूजन व विधिवत आरती करून खाटू नरेशांचा मनमोहक शृंगार करण्यात आला. शृंगार दर्शनासाठी दिवसभर भाविकांची मोठी गर्दी उसळली होती.

सायंकाळी ७ वाजता महाआरतीनंतर श्री स्वार्थी श्याम परिवार, अकोला यांच्या वतीने १७ वे श्री श्याम एकादशी संकीर्तन उत्साहात पार पडले. यावेळी अकोल्यातील सुप्रसिद्ध भजन गायक गोपाल शर्मा तसेच नागपूरचे भजन गायक कार्तिक गौतम यांनी हिंदी, राजस्थानी व मराठी भाषेतील एकापेक्षा एक सरस भक्तिगीते सादर करून उपस्थितांना भक्तिरसात तल्लीन केले. "हारे के सहारे", "संजो है श्याम का दरबार", "भक्त पुकारे आजा", "श्याम हमारे", "तेरा कितना किया श्रृंगार सांवरे" आदी भजनांवर भाविकांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त दाद देत भक्तिभावाने सहभाग नोंदविला. कार्यक्रमानंतर श्री स्वार्थी श्याम परिवाराच्या वतीने सर्व भाविकांना फलाहार प्रसादाचे वितरण करण्यात आले. मंदिर परिसर 'जय श्री श्याम'च्या जयघोषाने दुमदुमून गेला.

शिक्षण महर्षी सुभाषजी जैन यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभा प्रकाश परिवारातर्फे विविध उपक्रम

प्रतिनिधी १० जुलै

आलेगाव : परिसरात "शिक्षण महर्षी" म्हणून ख्यातीप्राप्त सुभाषजी जैन (माजी अध्यक्ष, आलेगाव एज्युकेशन सोसायटी) यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटच्या वर्धापन दिनानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शालेय साहित्य व गणवेशाचे वाटप करण्यात आले. तसेच इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या यशाचा गौरव करण्यात आला.

शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यामध्ये राष्ट्रीय ग्रामीण क्रमवारीत प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटच्या इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी अनुजा येऊल हिने द्वितीय क्रमांक मिळविला, तर अनुश्री बंड हिने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच नूतन विद्यालयाच्या इयत्ता पाचवीतील विद्यार्थिनी कु. आरुषी धारतरकर हिने राष्ट्रीय ग्रामीण क्रमवारीत प्रथम स्थान मिळवून शाळेचे नाव उज्ज्वल केले.

शैक्षणिक क्षेत्रातील आणखी एक उल्लेखनीय कामगिरी म्हणजे नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटचे चार विद्यार्थी इयत्ता सहावीकरिता पात्र ठरले असून, कु. अनुश्री बंड ही इयत्ता नववी प्रवेशासाठी पात्र ठरली. तिने संपूर्ण महाराष्ट्रातून १४ वा क्रमांक तर अकोला जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवून अभिमानास्पद कामगिरी केली. याशिवाय प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटच्या इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी अनन्या मुर्तडकर हिने इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड स्पर्धेत स्टेट टॉपर होऊन शिष्यवृत्तीसाठी पात्रता मिळवली. शाळेच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड फाउंडेशनतर्फे शाळेला गोल्डन अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून राधेश्याम शर्मा, मयूर भांसली, नानासाहेब देशमुख, बालब्रह्मचारी शंकर महाराज नवेगाव, निलेश कापकर, पुंडलिक निखाडे, संजय काळपांडे, भारत चिकटे, पुरुषोत्तम महल्ले, सलीम खान, नितीन ढोणे, विश्वासराव खुळे, नारायणराव महल्ले, नूतन विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक अंभोरे, संजय अप्पाजी वीर, भरतभाई शहा, शाळेचे अध्यक्ष अक्षयजी जैन, विनोदजी जैन आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे अध्यक्ष अक्षयजी जैन यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महावीर मांगूळकर व सुपाजी अंभोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विनोद नाप्ते यांनी केले. यावेळी इयत्ता नववीच्या विद्यार्थिनी तनुश्री निमकाळे, सृष्टी निमकाळे, भक्ती निमकाळे, ईश्वरी देशमुख तसेच इयत्ता दहावीची विद्यार्थिनी समीक्षा शिरेकर यांनी स्वरचित कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

सत्तारुढ राष्ट्रवादीच्या माजी आमदाराला पक्षाची व स्वपक्षीय कार्यकर्त्यांची ॲलर्जी

सोयाबीन बियाणे घोटाळा म्हणत कृषी मंत्र्यांवर अविश्वास ?

प्रतिनिधी १० जुलै

अकोला : ज्या राष्ट्रवादी काँग्रेसने माजी आमदार अमोल मिटकरी यांना सर्व काही दिले. त्या माजी आमदार अमोल मिटकरी यांना आता राष्ट्रवादी काँग्रेसची ॲलर्जी झाल्याचे चित्र होते. नुसतेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची नाही तर कार्यकर्त्यांची देखील ॲलर्जी झाली आहे. शुक्रवारी कृषी अधीक्षकाच्या चेंबर ला लॉक लावताना त्यांनी राष्ट्रवादी जिंदाबाद म्हणणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्याच्या तोंडावर हात का ठेवला असा प्रश्न विचारला जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या किसान सेल चे जिल्हाध्यक्ष अरविंद पाटील यांच्या व्यतिरिक्त इतर पक्षाचे कार्यकर्ते नव्हतेच असा धक्कादायक खुलासा निष्ठावंत राष्ट्रवादी कार्यकर्त्यांनी केला आहे. अरविंद पाटील यांनी जसे राष्ट्रवादी काँग्रेसचा.... तसेच त्यांना चुप राहण्याचा सल्ला माजी आमदार मिटकरी यांनी हातवारे करत दिला.

शेतकऱ्यांच्या सोयाबीन बियाणे बोगस निघाल्याप्रकरणी अकोल्यात शुक्रवारी अभूतपूर्व राजकीय आणि प्रशासकीय हायव्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला. एकीकडे सत्ताधारी पक्षाचे माजी आमदार अमोल मिटकरी यांनी जिल्हा कृषी अधीक्षकांना त्यांच्याच कार्यालयात कोंडून

घाम फोडला, तर दुसरीकडे आंदोलनादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या घोषणेवरून स्वतः मिटकरींनी आपल्याच कार्यकत्याच्या तोंडावर हात ठेवला. ज्या राष्ट्रवादी काँग्रेसने सर्व काही दिले त्या राष्ट्रवादी काँग्रेसबद्दल 'मिटकरींना नेमकी ॲलर्जी का?' अशी जोरदार चर्चा आता रंगली आहे. जिल्हा कृषी अधीक्षक मुरलीधर इंगळे यांना कोंडल्यानंतर माजी आमदार अमोल मिटकरी यांनी त्यांच्या दालनास लॉक लावले.

या संपूर्ण वादाच्या मुळाशी राज्याचे कृषी मंत्री आणि राष्ट्रवादीचेच नेते दत्तामामा भरणे यांच्यावरील अविश्वास असल्याची खात्रीलायक सूत्रांची माहिती आहे. बियाणे फसवणुकीच्या गंभीर प्रकरणात कृषी मंत्रालयाकडून ठोस कारवाई होत नसल्याने मिटकरी कमालीचे नाराज आहेत. स्वपक्षाचेच मंत्री असूनही प्रशासनाचा कारभार सुधारत नसल्याने, अमोल मिटकरींनी थेट आपल्याच मंत्र्यांच्या कार्यपद्धतीवर आणि पक्षाच्या भूमिकेवर अप्रत्यक्षपणे अविश्वास दाखवल्याचे या आक्रमक पवित्र्यावरून स्पष्ट होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस च्या किसान सेलचे जिल्हाध्यक्ष अरविंद पाटील यांना सोबत घेत हे आंदोलन केले गेले. पण, यात इतर राष्ट्रवादीचे कार्यकर्ते नसल्याची ओरड पक्षात सुरु झाली आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कृषी मंत्र्यांच्या विरोधात आंदोलनाचे सत्र पक्षातून सुरु आहे की विरोधकांकडून असा प्रश्न आता विचारला जात आहे.

सोयाबीन बियाणे घोटाळा म्हणत कृषी मंत्र्यांवर अविश्वास ?

कृषी कंपन्या आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचे संगनमत असून यामध्ये कोट्यवधी रुपयांचा महाघोटाळा झाल्याचा थेट आरोप मिटकरींनी केला. अधिकाऱ्यांच्या टोलवाटोलवीच्या उत्तरांमुळे संतप्त झालेल्या मिटकरी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी जिल्हा कृषी अधीक्षक मुरलीधर इंगळे यांना त्यांच्याच केबिनमध्ये कोंडून घातले आणि कार्यालयाला टाळे ठोकले. जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाला कुलूप ठोकत पायऱ्यांवर अमोल मिटकरी यांचे ठिय्या आंदोलन सुरू ठेवले. उगवण चाचणीमध्ये नापास झालेल्या कंपन्यांचे बियाणे शेतकऱ्यांच्या माथी मारल्याचा गंभीर आरोप मिटकरींनी केला आहे. कंपन्यांशी संगणमत करून कृषी विभागाकडून महाघोटाळा सुरू असल्याचा आरोप मिटकरी यांनी केला.

शेतात पाणी शिरल्यामुळे अनंत अडचणी

हिवरखेड : अकोट रोडवरील शेत शिवारात शेतात पाणी शिरल्याने पेरणी झालेली पिके पाण्याखाली आली. शेतात जाता येत नाही. आता पाणी जमिनीत मुरत नाही तोपर्यंत काहीही करता येत नाही अशी अडचण झाली आहे.<सुरूवातीला पाऊस नव्हता त्यामुळे पेरणी झाली नाही. आणि समाधानकारक पाऊस झाल्या नंतर पेरणी केली तर अतिवृष्टीमुळे पिके पाण्याखाली आली. नवीन समस्या निर्माण झाली आहे.

आदर्श शिक्षिका साधनाताई भोपळे यांच्या सेवापूर्तीनिमित्त कृतज्ञता सोहळा

हिवरखेड : येथील जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षिका ज्यांनी बुलढाणा व अकोला या दोन जिल्ह्यांतील जिल्हा परिषद शाळांमध्ये ३७ वर्षे शिक्षिका म्हणून उल्लेखनीय सेवा बजावली, आदर्श शिक्षिका सौ. साधनाताई श्यामशील भोपळे यांच्या सेवापूर्तीनिमित्त माहेश्वरी भवन येथे कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते, अध्यक्षस्थानी माजी प्रशासन अधिकारी सुभाष राऊत होते.

प्रमुख उपस्थिती म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक शंकरराव पुंडकर, माजी गटविकास अधिकारी अशोक बांगर, माजी विस्तार अधिकारी रामेश्वरजी बोचरे, चित्रलेखाताई बोचरे, केंद्रप्रमुख गजानन राऊत, केंद्रप्रमुख गोपाल मोहे व श्यामशील भोपळे उपस्थित होते. कार्यक्रमाचा प्रारंभ महाराष्ट्र राज्य गीताने करण्यात आला. प्रास्ताविक प्राईम संवादचे कार्यकारी संचालक ॲड.कौतेय भोपळे यांनी केले. उत्तरात सौ. साधनाताई भोपळे यांनी सेवाकाळातील आठवणींना उजाळा देत शिक्षणसेवेचा वसा पुढेही जपण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुळसीदास खिरोडकर यांनी केले, तर प्रा. कौस्तुभ भोपळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास शिक्षकवृंद, माजी विद्यार्थी, नातेवाईक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी संतोषकुमार राऊत, मनीष गिऱ्हे, निलेश खिरोडकार, अपर्णा आमले, खडसे, यांनी पुढाकार घेतला.

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी
अकोला यांचे कार्यालय, अकोला
ई-मेल:tah.akola@rediffmail.com

क्र.प्रस्तु-2/कावि-1266/ 2026 दिनांक 10.07.2026

जाहीरनामा

याव्दारे सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक 12 मार्च, 2025 नुसार जन्म मृत्यु नोंदणी करीता अर्जदार कृष्णा मंगेश यादव, रा. हरिहर पेठ अकोला याचे वडील नामे मंगेश दलाईराम यादव यांचा मृत्यु अकोला येथे दिनांक 08.06.2020 रोजी झाला असून त्यांच्या मृत्युची नोंद निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग अकोला महानगरपालिका, अकोला येथे नजर चुकीने करण्यात आली नाही. करिता अर्जदार यांनी मृत्युची नोंद घेण्याकरीता आदेश होणेबाबत निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, अकोला महानगरपालिका, अकोला येथे विनती अर्ज सादर केला आहे.

त्यानुसार, कृष्णा मंगेश यादव, रा. हरिहर पेठ अकोला यांचे वडिल नामे मंगेश दलाईराम यादव यांच्या मृत्युची नोद घेण्याकरिता कोणाला काही आक्षेप / हितसंबंध असतील त्यांनी आपले आक्षेप हरकत अर्ज हया कार्यालयात जाहिरनामा प्रसिध्दी पासून सुट्टीचे दिवस वगळून पंधरा दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावे, विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले आदोप हरकती विचारात घेतल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्थळ : अकोला
दिनांक : ११-०७-२०२६

कुणाल झाल्टे
तहसिलदार अकोला

दि अकोला अर्बन बँकेची 63 वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

प्रतिनिधी ११ जुलै

अकोला : महाराष्ट्र राज्यातील अग्रगण्य मल्टीस्टेट शेडयुल्ड बँक दि अकोला अर्बन को-ऑपरोटेव्ह बँक लि. अकोला ची ६३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दि.१०.०७.२०२६ रोजी "गायवाडा" शेतकरी भवन कृषी उत्पन्न बाजार समिती अकोलाच्या सभागृहात संपन्न झाली. या सभेस अनेक गणमान्य भागधारक उपस्थित होते. सभेचे अध्यक्षस्थान शंतनु जोशी यांनी स्विकारले व सभेचे कामकाजास प्रारंभ झाला.

सभेच्या प्रारंभी अहवाल वर्षात जे अहवाल वर्षामधे भारतातील जे थोर राजकीय नेते, संशोषक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, साहित्यिक, सैनिक, कलावंत, शिक्षण तज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, आर्थिक व सहकार क्षेत्रातील मान्यवर, थोर विभूती तसेच दि अकोला अर्बन बँकेचे जे सभासद, ग्राहक, ठेवीदार, हितचिंतक व कर्मचारी पंचतत्वात विलीन झालेत त्यांना सभेमधे भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

त्यानंतर बँकेचे अध्यक्ष शंतनु जोशी यांनी प्रास्ताविक केले. आपल्या प्रस्ताविकमधे सभेस उपस्थित सर्व भागधारकांचे त्यांनी स्वागत केले व अहवाल वर्षात बँकेने केलेल्या प्रगतीचा आढावा सभेसमोर सादर केला. दि. ३१.०३.२०२६ अखेर बँकेचे वसुल भागभांडवल ७१.७३ कोटी आहे. राखीव व इतर नियी २२४.९६ कोटी आहेत. ठेवी रु.१८९८.३१ कोटी असुन कर्ज वाटप रु.११२३.६४ कोटी तसेच निव्वळ नफा रु.१४.१० कोटी आहे. बँकेच्या निव्वळ एन.पी.ए. चे प्रमाण ०.६१ टक्के आहे. सन २०२५-२६ करिता सुद्धा भागधारकाना ६.७५ टक्के दराने लाभांश वितरित करण्यास सुरवात झाली आहे बँकेने अहवाल वर्षात ३ नवीन शाखा सुरू केल्या आहेत. तसेच बँकचे कार्यक्षेत्र संपूर्ण गुजरात राज्यामध्ये वाढविण्यास रिझर्व्ह बँकेकडून परवानगी प्राप्त झाली आहे.

बँकेच्या सक्षम आर्थिक स्थितीबद्दल सभेमधे समाधान व्यक्त करण्यात आले. या सर्व प्रगतीमधे भागधारक, खातेदार, ठेवीदार व कर्मचारी या सर्वांचे सहकार्य आहे. व भविष्यातही असेच सहकार्य मिळेल अशी अपेक्षा आपल्या प्रास्ताविकामधे अध्यक्षांनी व्यक्त केली. व सभेस उपस्थित सर्व भागधारकांचे आभार व्यक्त केले. दि.१८.०६.२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रतिवृत्त बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आर.एम. सोनटक्के यांनी सादर केले. त्यास सभेने मान्यता कायम केली. यानंतर विषयसुचीनुसार विषय बँकेचे उपाध्यक्ष राहुल राठी, संचालक केदार खपली, धनंजय पाटील, किरण खोत, शार्दुल दिगंबर, राहुल गोयनका यांनी सभेसमोर सादर केले. त्या सर्व विषयांस उपस्थित सभासदांनी मान्यता दिली.

सभेचे संचालन बँकेचे संचालक दिपक मायी यांनी केले तर आभार प्रदर्शन बँकेचे संचालक माधव बनकर यांनी केले. सभेस संचालक अमरिकसिंग वासरीकर, प्रमोद शिंदे, अजय गांधी, मोहन अभ्यंकर, कैलाशनाथ मशानकर, संगीता गांधी, सीमा डिक्कर, तसेच बँकेचे बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य भूषण काळे, सुभाष गोरे, प्रसाद देशपांडे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी राधेश्याम चिराणिया, कर्मचारी प्रतिनिधी पंजाब अव्हाळे बँकेचे वरिष्ठ आधकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात ६३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शनिवार दि. ११ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

नेत्यांचे मागणी पत्र, अन् श्रेयवादाचे सत्र, आश्वासनच मात्र...

प्रकल्प नाही आले विकासाचे झाले येले पाटबंधारे मंडळ गेले

जिल्हा उपेक्षित, अधिवेशनात दुर्लक्षित

कायम आकांक्षित !

*रस्ता चौपदरी नव्हे तर होतोय दुपदरी *जिल्हा नदी जोड मधून वगळला...

● अतिष देशमुख @ वाशीम ●

वाशीम जिल्ह्याची आकांक्षीत जिल्हा म्हणून नोंद आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी वेगळा निधी येणे तर सोडा पाठबंधारे मंडळही गेले. कोणतेच मोठे प्रकल्प नाही आले. जिल्ह्याचा नदीजोडमध्ये अद्यापही समावेश झाला नाही. तर वाशीम शहरातून जाणारा रस्ता चौपदरी ऐवजी दुपदरी होत आहे. सिंचनाचा अनुषेश कायम असून कायद्या व नियम वाशीम जिल्ह्यासाठी नसल्याचे दिसून येत आहे. अर्थसंकल्प अधिवेशनातही जिल्ह्याकडे दुर्लक्ष झाले असून नेत्यांचे मात्र, कायम मागणी सत्र सुरू आहे. श्रेयवादासाठी मात्र, आश्वासनावर आश्वासन देवून जिल्ह्याला उपेक्षीतच ठेवल्या जात आहे.



आकांक्षीत जिल्हा म्हणून ओळख असलेल्या वाशिम जिल्ह्याच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच आली असून वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पातून वाशिम जिल्हा वगळण्यात आला आहे. त्यामुळे सिंचनाचा अनुशेष भरून निघण्याची शेतकऱ्यांची आशा मावळली आहे. कारण अधिवेशनातही बैठक आणि चर्चा घेवून कोणताही ठोस निर्णय झाला नाही. नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाल्याचे पोस्टर लावून चमकोगिरी करणारे नेते मात्र आता तोंडघशी पडले असून जिल्ह्यातील राजकारण्यांची निष्क्रियता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प हा राज्यस्तरीय नदीजोड प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पाव्दारे वैनगंगा नदीवरील भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द प्रकल्पात पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून पुर्णा-तापी खोऱ्यातील बुलढाणा जिल्हयातील नळगंगा प्रकल्पापर्यंत नदीजोड कालव्याद्वारे वळविणे प्रस्तावित आहे. या कालव्याव्दारे विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा ह्या सहा जिल्ह्यातील १५ तालुक्यातल्या एकूण ३७१२७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्पाची जलसंपदा विभागाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचीनुसार प्रकल्पाची किंमत रु.८८,५७५ कोटी इतकी आहे. पूर्वी या प्रकल्पात वाशिम जिल्ह्याचाही समावेश नव्हता आता मुख्यमंत्री दुसऱ्या टप्प्यात वाशीम जिल्ह्याचा समावेश करण्याचे आश्वासन २८ नोव्हेंबरच्या सभेत दिले यावरून जिल्ह्याचा नदीजोड प्रकल्पात समावेश नव्हता हे सिध्द झाले आहेत. आताही अधिवेशनात बैठकीचे सत्र सुरू असून आकांक्षीत जिल्ह्याला फक्त बैठका व आश्वासनावरच ठेवले आहे. जिल्ह्याकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले आहे.

विदर्भातील अधिवेशनात जिल्ह्याच्या विविध प्रश्नांवर चर्चा होवून निर्णय होतील अशी अपेक्षा होती. मात्र, अधिवेशनात जिल्ह्याला कोणताच मोठा फायदा झाला नाही. कुठल्या प्रकारचे ठोस निर्णय न झाल्याने आकांक्षीत जिल्ह्याला दुर्लक्षीत करत उपेक्षीत ठेवण्यात आले आहे. आकांक्षीत जिल्हा म्हणून सर्वप्रथम वाशीम जिल्ह्याचा विकासाच्या दृष्टीने विचार व्हावा यासाठी जिल्ह्यातील नेत्यांनी पुढे येणे गरजेचे आहे. निव्वळ पत्र आणि आश्वासन देवून आशेवर ठेवणे म्हणूजेच जिल्हा वासियांची फसवणूक करणे आहे. आजपर्यंत कोणतेच मोठे प्रकल्प आले नाहीत. आले तर ते होवू दिले नाहीत. जे जिल्ह्यात आहे ते इतर जिल्ह्यात नेल्या जात आहे. रस्तेही भ्रष्टाचाराने खड्ड्यात गेले आहेत.

जिल्ह्यात भ्रष्टाचार निरंतर, पाटबंधारे मंडळाचे स्थलानंतर !

जिल्ह्यातील पाणी टंचाई व दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन सन २००८ मध्ये वाशीम जिल्ह्यात मंडळ कार्यालयाची स्थापना करण्यात आली होती. त्यामुळे सिंचन क्षमता वाढीस मदत झाली. परंतु महाराष्ट्र शासन जल संपदा विभागाने २३ ऑक्टोंबर २०२३ रोजी शासन निर्णय काढून मंडळ कार्यालय स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला. ही बाब मागास आणि अकांक्षीत असलेल्या वाशीम जिल्ह्यासाठी अन्यायकारक आहे.

तरी देखील जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव येथे स्थलांतरित करण्यात आले. २७ ऑक्टोंबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. यामुळे सरकार विरोधात जिल्ह्यात तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. कार्यालय स्थलांतर होत असतांना निव्वळ दिखावा म्हणुन मागणी करतांना लोकप्रतिनिधी पुढाकार घेतात. मात्र जिल्हयात नविन मोठे प्रकल्प आणुन विकासाचा मार्ग काढतांना दिसत नाही. यावरून निष्क्रीयता सिध्द होते.

जिल्ह्याच्या विकासासाठी, सिटी न्युज सुपरफास्टचा पाठपुरावा

नदी जोड प्रकल्पातून वाशीम जिल्हा वगळल्याचे वृत्त मालिका सातत्याने सांध्य. दै. सिटी न्युज सुपरफास्ट लावून धरत आहे. तर या सिंचनाचा अनुषेश भरूण काढण्यासाठी व मागासलेले पण दुर करण्यासाठी ,विकासाचा मार्ग काढण्यासाठी, रखडलेले प्रकल्प पुर्ण करण्यासाठी, रस्त्याच्या दुरूस्तीसाठी, भ्रष्टाचाराच्या विरोधात सिटी न्युज सुपरफास्ट सातत्याने पाठपुरावा करून प्रत्येक भ्रष्टाचाराच्या व न्यायाच्या शेकडो वृत्त मालिका लावून लक्ष वेधत असते तरी सुध्दा मात्र आकांक्षीत जिल्ह्याचा आकांक्षीत जिल्हा म्हणून कलंक पुसण्यासाठी कोणीही पुढाकार घेत नाही फक्त निवेदनाचे पत्र देवून श्रेयवादाचे सत्र सुरू आहे. जिल्हा वासीयांना मात्र आश्वासनच मिळत आहे.

अकोला

वाशीम जिल्ह्यातील अधिकाऱ्यांच्या लक्ष्मीदर्शनाच्या लालसेमुळे अनेक प्रकल्प रखडले असल्याचे जाहीर वक्तव्य चार वर्षापूर्वी अकोला येथील कार्यक्रमात केले. या संदर्भात आपण वाशीम जिल्हा अधिकाऱ्यांसोबत फोनवर बोलून संबंधित अधिकाऱ्यांबद्दल नाराजी व्यक्त केली होती. असे ना. नितीन गडकरी म्हणाले होते.

हिंगोली

अकोला -नांदेड महामार्गातील वाशीम शहरातून जाणाऱ्या रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी ६ वर्षापूर्वीच पाटणी कॉम्प्लेक्सच्या कार्यक्रमात मंजुरी दिली. मात्र लोकप्रतिनिधी या कामासाठी पाठपुरावा न केल्यामुळे हे काम अपूर्ण राहीले. आणि आपणही विसरून गेल्याचे ना. गडकरी यांनी हिंगोली येथील कार्यक्रमात सांगितले. यावरून वाशीमचे लोकप्रतिनिधी किती कर्तव्यदक्ष आहे हे सिध्द होते.

नितीन गडकरींनी आतापर्यंत ३ वेळा टोचले कान, विकासाचे नाही भान ...

केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी वाशीम जिल्ह्यातील अधिकाऱ्यांबद्दल अकोला येथील कार्यक्रमात २ वर्षापूर्वी अधिकाऱ्यांच्या लक्ष्मी दर्शनामुळे जिल्ह्यातील प्रकल्प रखडले असल्याचे सांगितले तर ६ महिन्यापूर्वी हिंगोली येथील कार्यक्रमात वाशीमच्या लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे आणि मी विसरल्यामुळे ६ वर्षापूर्वी एका कार्यक्रमात मुंजर केलेला रस्त्याच्या कामाचा पाठपुरावा न केल्याने हे रस्त्याचे काम अपूर्ण राहील्याचे जाहीरपणे सांगितले होते. वाशीम येथील कार्यक्रमातही लोकप्रतिनिधींना विकासाचे नाही 'भान', गडकरींनी पुन्हा टोचले 'कान' यावरून अधिकाऱ्यांच्या लक्ष्मीदर्शनामुळे प्रकल्प रखडले आहेत. तर लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळेच जिल्ह्याचा विकास खुंटल्याचे जाहीर झाले आहे. मात्र तीन वेळा नितीन गडकरींनी अधिकारी व लोकप्रतिनिधींचे कान टोचूनही त्यांना शरम नाही ते बेशरम झाले आहे. राजकारणी व्यापारी झाल्याने जनता भिकारी होत आहे. श्रीमंत श्रीमंत होत चालला तर गरीब गरीब होत चालला आहे.

वाशीम

वाशीम येथील कार्यक्रमात नगर पालिकेकडे पैसे नसतील तर विष घ्यायला पैसे आहेत का असा टोला गडकरींनी दिला होता. तर आमदार , खासदारांनी ठेकेदारांना त्रास देवू नये, विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही. अशी ग्वाहीही दिली. मात्र श्रेयवादाची लढाई लढा अन् विकासाचा मार्ग काढा असे त्यांनी वाशीम येथील कार्यक्रमात सांगितले.

अधिवेशन

अधिवेशनात वाशीम जिल्ह्याला काहीच मिळाले नाही. जिल्ह्याच्या विकासासाठीही लोकप्रतिनिधीनी आराखडा तयार करून अर्थ संकल्पात सादर केला नाही. त्यामुळे राज्याच्या अधिवेशनात वाशीम आकांक्षित जिल्हा म्हणून पुन्हा दुर्लक्षीतच झाला आहे.

दावोस करारांतील उद्योग वाशीममध्ये द्या

विधान परिषदेत आ. भावना गवळी पाटील यांची मागणी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

महाराष्ट्र विधान परिषदेच्या पावसाळी अधिवेशनात आमदार भावना गवळी पाटील यांनी दावोस येथे राज्य सरकारने विविध बहुराष्ट्रीय कंपन्यांसोबत केलेल्या विक्रमी गुंतवणूक करारांपैकी काही उद्योग आकांक्षित वाशिम जिल्ह्यात उभारावेत, अशी जोरदार मागणी आमदार भवना गवळी यांनी केली आहे.

राज्यातील उद्योग केवळ पुणे, मुंबई आणि नागपूरसारख्या महानगरांमध्ये केंद्रित न राहता पश्चिम विदर्भासह मागास व आकांक्षित जिल्ह्यांमध्येही उभारले जाणे आवश्यक असल्याचे त्यांनी सभागृहात ठामपणे मांडले. स्थानिक स्तरावर उद्योग निर्माण झाल्यास हजारो युवकांना त्यांच्या गावाजवळच रोजगार उपलब्ध होईल आणि स्थलांतराचे प्रमाण कमी होईल,

समृद्धी महामार्ग, कापूस उत्पादनाची क्षमता लक्षात घेऊन टेक्स्टाईल पार्कउभारण्याचाही आग्रह

असे त्या म्हणाल्या. वाशिम जिल्ह्यातून समृद्धी महामार्ग जात असल्याने वाहतूक, दळणवळण आणि बाजारपेठांशी संपर्काच्या दृष्टीने जिल्ह्याला मोठा फायदा होऊ शकतो. तसेच वाशिम हा कापूस उत्पादक जिल्हा असल्याने येथे अत्याधुनिक टेक्स्टाईल पार्क उभारल्यास शेतकऱ्यांनाही त्याचा थेट लाभ मिळेल, असे त्यांनी नमूद केले. राज्यातील गुंतवणुकीपैकी वाशिम जिल्ह्याच्या वाट्याला केवळ १०३.४८ कोटी रुपयांची गुंतवणूक आली असून ही रक्कम अत्यंत अपुरी असल्याचे सांगत, दावोस करारांतील उद्योगांना वाशिममध्ये प्राधान्य द्यावे, अशी आग्रही मागणी त्यांनी केली. यावर उत्तर देताना उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी आकांक्षित वाशिम जिल्ह्यात नवीन उद्योग आणण्यासाठी शासन सकारात्मक असून, आवश्यक त्या सर्व स्तरांवर प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन सभागृहात दिले.

लोकप्रतिनिधीनी सहकाराचा स्वाहा:कार केला

*सुभाष देवढे पाटील यांचे टीकास्त्र * सावनेरच्या आमदारांनी बाजार समितीच्या गैरव्यवहाचा तारांकीत प्रश्न उपस्थित केला

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात सावनेरचे आमदार आशीष देशमुख यांनी रिसोड बाजार समितीच्या आवारात असलेल्या ११ भूखंडाच्या बेकायदेशिर भाडेपट्टा कराराबाबत तारांकीत प्रश्न उपस्थित केला. विधानसभेच्या सभागृहात हा गंभीर प्रकार उघडकीस आल्याने 'त्या ११ भूखंडाचा भाडेपट्टा रद्द करण्यात आला आहे. रिसोड व मालेगाव तालुक्यातील सहकार क्षेत्राची वाट लावण्यासाठी या दोन्ही तालुक्यातील आजी माजी लोकप्रतिनिधीच जबाबदार असल्याचे टीकास्त्र सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे पाटील यांनी सोडल्याने दोन्ही तालुक्यातील सहकारातून स्वाहा:कार करणाऱ्या कथित पुढाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची सर्वत्र चर्चा आहे.

रिसोड पाठोपाठ मालेगाव बाजार समितीमध्ये अनेक गौडबंगाल

रिसोड बाजार समितीमधील बेकायदेशिर भाडेपट्टा प्रकरण उघडकीस आल्याने ११ भूखंडाचे भाडेपट्टा करारनामे रद्द करण्यात आले आहेत. रिसोड विधानसभा मतदार संघातील मालेगाव कृषी उत्पन्न बाजार समितीसुद्धा नियमबाह्य व बेकायदेशिर प्रकरणात आघाडीवर असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे पाटील यांनी केला आहे. तसेच रिसोड व मालेगाव तालुक्यातील सहकार क्षेत्रात सुरू असलेल्या व पुर्वी झालेल्या सर्व गैरप्रकाराला व भ्रष्टाचाराला आजी, माजी लोकप्रतिनिधी आणि सहकार क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारीच जबाबदार असल्याची माहिती देवढे पाटील यांनी दिली.

रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मालकीच्या असलेल्या रिसोड येथील गट क्रमांक १०/६ मधील विकास आराखड्याला पुणे येथील पणन संचालनालयाने २९ मे २०१९ रोजी मंजुरी दिली होती. ही मंजुरी देताना त्या विकास आराखड्याला स्थानिक सक्षम प्राधिकरण म्हणजेच रिसोड नगर परिषदेची अंतिम मंजुरी घेणे कायदेशिररित्या बंधनकारक होते. परंतु, रिसोड बाजार समितीने 'या' अटीला स्वत:च्या स्वार्थापोटी दुर्लक्षीत केले. तसेच कोणत्याही सक्षम प्राधिकरणाची व पुणे येथील पणन संचालकांची पुर्व परवानगी न घेता विकास आराखड्यामध्ये परस्पर व बेकायदेशिर बदल केलेत. हा गंभीर प्रकार मे २०२६ मध्ये शासनाच्या निदर्शनास आला. या नियमबाह्य व बेकारदेशिर प्रकरणाची तात्काळ चौकशी करण्याचे आदेश नांदगाव खंडेश्वर येथील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या चौकशी समितीला वरिष्ठांनी दिले होते. या समितीने सखोल तपास करून २५ मे २०२६ रोजी शासनाला अहवाल सादर केला. या अहवालात रिसोड बाजार समितीने अटीचे उल्लंघन केल्याचे सिद्ध झाले. या अहवालाच्या अनुषंगाने पणन मंत्र्याच्या वतीने ना. जयकुमार रावल यांनी विधानसभेत आमदार आशीष देशमुख यांच्या प्रश्नाला उत्तर देताना पणन संचालनालयाने ११ जून २०२६ रोजीच्या आदेशान्वये रिसोड बाजार समितीने १५ सप्टेंबर २०२५ रोजीच्या सभेत मंजुर केलेला वादग्रस्त ठराव क्रमांक ५ (१) पुर्णपणे रद्दबातल केला आहे. शासनाने फक्त हा ठराव रद्द करून न थांबता रिसोड बाजार समितीच्या मुख्य आवारामधील सर्व्हे नंबर १०/२ मधील भूखंड आणि सर्व्हे नंबर १०/६ मधील भूखंड अशा एकूण ११ भूखंडाबाबत करण्यात आलेले भाडेपट्टा करारनामे तात्काळ रद्द करण्याची कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, १३ ऑक्टोबर २०२५ रोजी या ११ भूखंडाना भाडेपट्ट्याने देण्याबाबत जी मूळ मान्यता देण्यात आली होती, ती मान्यताही पणन संचालनालयाने ११ जून २०२६ च्या पत्राद्वारे अधिकृतपणे रद्द केली आहे.

या प्रकरणाचे गांभीर्य पाहता, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे अवर सचिव माधव शिंदे यांनी २३ जून २०२६ रोजी पत्र पाठवून पणन विभागाचे कार्यकारी संचालक आणि पणन संचालक, पुणे यांना तात्काळ या तारांकीत प्रश्नाबाबतचा भागनिहाय वस्तुस्थिती दर्शक उत्तर आणि अनुषंगिक सुस्पष्ट माहिती दोन दिवसात सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय नविन नगर परिषद कॉम्प्लेक्स, रविवार बाजार, वाशिम जि. वाशिम येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135